

"शब्द नव्हे शस्त्र आहे,.... समृद्ध कर्जत चे अस्त्र आहे."

समृद्ध कर्जत

RNI No.: MAHMAR/2015/65594 ● Post Regd No.: ANR/080/2018-2020

संपादक - भाऊसाहेब तोरडमल

वर्ष ११ वे | अंक ५० वा | सोमवार दि १३ जुलै ते रविवार १९ जुलै २०२६| किंमत ४ रु | पाने ४

शेतकरी कर्जमाफी योजनेतील दोन्ही जाचक अटी हटवल्या

आमदार रोहित पवार यांच्या आंदोलनाचे मोठे यश

राज्यातील सुमारे ३६ लाख तर कर्जत-जामखेडमधील ६० हजार शेतकऱ्यांना होणार लाभ



कर्जत प्रतिनिधि - ता. १० – २०१९ मध्ये 'महात्मा फुले शेतकरी कर्जमाफी योजने'चा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना या कर्जमाफीतून वगळण्याची अट आणि नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान मिळण्यासाठी २०२६-२७ सालचं कर्ज नियमित भरण्याची या दोन्ही जाचक अटी काढून टाकल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांनी अधिवेशनाच्या अखेरच्या दिवशी विधानसभेत केली. या जाचक अटी काढून विनाअट सरसकट कर्जमाफीसाठी आंदोलनाच्या माध्यमातून राज्यभर रान उठणवारे कर्जत-जामखेडचे आमदार रोहित पवार यांच्या आंदोलनाचे मोठे यश असून याचा राज्यातील सुमारे ३६ लाख तर कर्जत-जामखेडमधील सुमारे ६० हजार शेतकऱ्यांना लाभ होणार आहे. राज्याला सध्या विरोधी पक्षनेता नसला तरी विरोधी पक्ष नेत्याला साजेशी भूमिका सध्या कर्जत-जामखेडचे आमदार रोहित पवार हे निभावताना दिसत आहेत. कांदा दरवाढीचे आंदोलन असो किंवा विनाअट सरसकट शेतकरी कर्जमाफीसाठी त्यांनी दिलेला लढा असो, ही दोनच उदाहरणे त्यासाठी पुरेशी आहेत. राज्य सरकारने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना जाहीर केली. परंतु यामध्ये अनेक अटीशर्ती टाकल्याने या कर्जमाफीपासून सुमारे ७० टक्के शेतकरी वंचित राहणार असल्याची भूमिका मांडत आमदार रोहित पवार यांनी पहिल्या दिवसापासून याविरोधात आवाज उठवला. सुरवातीला मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या भेटी घेऊन त्यांना निवेदन दिले आणि या योजनेतील जाचक अटी काढून टाकण्याची मागणी केली होती. तसेच नंतर यासाठी त्यांनी सरकारकडे पाठपुरावाही केला, परंतु यश येत नसल्याने त्यांनी थेट पंढरपुरात अन्नत्याग आंदोलनाचे हत्यार उगारले. त्यांनी पंढरपुरात तीन दिवस केलेल्या अन्नत्याग आंदोलनाला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आणि हे अन्नत्याग आंदोलन मागे घेण्यासाठी मंत्री गिरीश महाजन यांनी आंदोलनस्थळी भेट दिली. त्यावेळी मुख्यमंत्र्यांसोबत बैठक घेऊन हा विषय मार्गी लावण्याचे आश्वासन त्यांनी दिल्यामुळे आमदार रोहित पवार यांनी हे आंदोलन मागे घेतले, परंतु सरकारने दिलेला शब्द पाळला नाही त्यामुळे आमदार रोहित पवार यांनी पुन्हा एकदा शेतकरी एल्गार आंदोलनाची घोषणा केली. त्यानुसार दोन आठवड्यांपूर्वी संभाजीनगरमध्ये झालेल्या या एल्गार आदोलनालाही राज्यभरातील हजारो शेतकरी उपस्थित होते. त्यावेळीही मंत्री गिरीश महाजन यांनी आमदार रोहित पवार यांच्याशी संपर्क साधून मुंबईत मुख्यमंत्र्यांच्या भेटीचे आश्वासन दिले आणि





आंदोलन मागे घेण्याची विनंती केली. पंढरपूर येथील आंदोलनात फसवणूक झाल्याचा वाईट अनुभव असतानाही सरकारचा आणि मंत्र्यांचा सन्मान राखण्यासाठी त्यांनी हे आंदोलनही मागे घेतले. त्यानंतरी मुंबईत मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन त्यांच्याशी या विषयावर चर्चा केली असता त्यांनी कर्जमाफीसाठी नेमलेल्या परदेशी समितीसोबत बैठक घेऊन चर्चा करण्यास सुचवले. त्यानुसार प्रविणसिंह परदेशी यांची भेट घेऊन त्यांनी चर्चेसाठी १० जुलै ही तारीख निश्चित केली. परंतु या बैठकीला एकही अधिकारी हजर राहिला नाही. याविरोधातही आमदार रोहित पवार यांनी माध्यमांपुढे येऊन सरकारच्या या कृतीचा निषेध केला. त्यानंतर अधिवेशनाच्या एक दिवस आधी अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलताना त्यांनी विधीमंडळात घणाघाती भाषण करुन कर्जमाफीच्या मुद्द्यावर सरकारला घेरले आणि सरकार शेतकऱ्यांना कशा प्रकारे फसवत आहे, हे पुराव्यानिशी दाखवून दिले. आमदार रोहित पवार यांनी कर्जमाफीच्या विषयावर विधानसभेत केलेल्या आक्रमक भाषणामुळे उघड्या पडलेल्या सरकारचा राजकीय तोटा होणार असल्याचे लक्षात येताच सरकारने याबाबत वेगाने हालचाली सुरु केल्या आणि कोणत्याही अटीशर्ती टाकल्या नसल्याची भूमिका सुरवातीला घेणाऱ्या सरकारला अखेर याबाबत माघार घ्यावी लागली आणि आज विधानसभेत खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच शेतकरी कर्जमाफीच्या जाचक अटी वगळण्याची घोषणा केली. हा आमदार रोहित पवार यांच्या आंदोलनाचा नैतिक, सैद्धांतिक आणि राजकीय विजय आहे. घोषणा सरकारने केली असली तरी आमदार रोहित पवार यांनी यासाठी केलेले राज्यव्यापी आंदोलन आधीच घराघरात पोचल्यामुळे या कर्जमाफीचे संपूर्ण श्रेय हे आमदार रोहित पवार यांनाच द्यावे लागेल. या यशामुळे त्यांची राजकीय उंचीही निश्चितच वाढणार असून रिझल्ट देणारा एक लढाऊ आमदार अशी प्रतिमा बनण्यास कर्जमाफीच्या या विषयामुळे मदत होणार आहे.

'कर्जमाफी योजनेतील अटी काढल्यामुळं या योजनेतून वंचित राहणाऱ्या राज्यातील सुमारे ७० टक्के शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने न्याय मिळणार आहे. वास्तविक हा निर्णय आधीच व्हायला पाहिजे होता, परंतु त्यासाठी अनेकदा अर्ज-विनंत्या कराव्या लागल्या, पंढरपूर आणि संभाजीनगर येथे आंदोलन करावे लागले. त्यामुळे उशिरा का होईना सरकारला हा निर्णय घ्यावा लागला. हे संपूर्ण राज्यभरातील शेतकऱ्यांचं आणि याबाबत आवाज उठवणारे सर्व नेते, संघटना या सर्वांचं हे यश आहे. या विषयात अहंकार बाजूला ठेवून निर्णय घेण्याची सद्बुद्धी विठुरायाने सरकारला दिली. त्याप्रमाणे निर्णय घेतला, याबाबत सरकारचेही आभार!''- रोहित पवार (आमदार, कर्जत-जामखेड)

समृध्द कर्जत वर्ष ११ वे | अंक ५० वा | सोमवार दि १३ जुलै ते रविवार १९ जुलै २०२६ | किंमत ४ रु | पाने ४
RNI No.. MAHMAR/2015/65594 Post Regd No.: ANR/080/2018-2020 संपादक भाऊसाहेब तोरडमल

कर्जतच्या 'सर्व सामाजिक संघटना' संस्थेला राज्यस्तरीय प्रथम क्रमांकाचा 'छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार'

सलग २१००+ दिवसांच्या श्रमदानाचा गौरव, शिलेदारांचा जल्लोष

कर्जत: पर्यावरण संवर्धन, अविरत श्रमदान आणि लोकसहभागाच्या जोरावर कर्जतचे नाव पुन्हा एकदा संपूर्ण महाराष्ट्रात अभिमानाने चमकले आहे. महाराष्ट्र शासनाच्या वतीने दिला जाणारा अत्यंत प्रतिष्ठेचा " छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार – २०२४" कर्जतच्या 'सर्व सामाजिक संघटना' या संस्थेला जाहीर झाला आहे. सेवाभावी संस्था (राज्यस्तर) या गटामध्ये संघटनेने संपूर्ण राज्यातून प्रथम क्रमांक पटकावून कर्जतच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. राज्यस्तरीय मूल्यांकन समितीने या पुरस्काराची अधिकृत घोषणा केली असून, पर्यावरण संवर्धन, मोठ्या प्रमाणावर केलेले वृक्षारोपण, प्रत्यक्ष वृक्षसंवर्धन आणि समाजाच्या सक्रिय लोकसहभागाची दखल घेत हा सर्वोच्च बहुमान संघटनेला देण्यात आला आहे.हा अत्यंत मानाचा पुरस्कार जाहीर होताच 'सर्व सामाजिक संघटने'च्या सर्व शिलेदारांनी कर्जतमध्ये एकत्रित येत प्रचंड आनंद साजरा केला. गेल्या अनेक वर्षांच्या कष्टाला राज्य शासनाची मिळालेली ही मोठी पावती असल्याने सर्व कार्यकर्त्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद आणि अभिमान ओसंडून वाहत होता. एकमेकांना पेढे भरवत, टाळ्यांच्या कडकडाटात आणि पर्यावरण संवर्धनाच्या घोषणा देत सर्व वृक्षमित्रांनी या ऐतिहासिक क्षणाचा जल्लोष केला.'हरित कर्जत' घडविण्याचा दृढ संकल्प उराशी बाळगून 'सर्व सामाजिक संघटना, कर्जत' च्या शिलेदारांनी सलग २१०० हून अधिक दिवस अविरतपणे श्रमदान केले आहे. केवळ झाडे लावणे एवढ्यावरच न थांबता, निसर्गाचे रक्षण करत हजारो वृक्षांचे प्रत्यक्ष संगोपन करून ते जगवण्याचे कठीण काम या टीमने सातत्याने करून दाखवले आहे. त्यांच्या याच निस्वार्थ आणि खडतर तपस्येचे फळ आज या राज्यस्तरीय पुरस्काराच्या रूपाने मिळाले आहे. हा बहुमान जाहीर झाल्यानंतर संघटनेच्या वतीने भावना व्यक्त करताना सांगण्यात आले की, "हा सन्मान आणि गौरव केवळ संघटनेचा नसून, प्रत्येक श्रमदानी शिलेदाराचा, प्रत्येक वृक्षमित्राचा, कर्जतच्या प्रत्येक नागरिकाचा आणि पर्यावरणासाठी निःस्वार्थपणे योगदान देणाऱ्या सर्वांचा आहे.

■ उर्वरित पान ३ वर

कर्जत शहरातील अतिक्रमणाचा प्रश्न पेटला; 20 जुलैला उपोषणाची ठिणगी

कर्जत शहरातून जाणाऱ्या प्रमुख राज्यमार्गावरील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हद्दीतील अतिक्रमणांमुळे वाहतूक व्यवस्था पूर्णपणे विस्कळीत झाली असून, प्रशासनाकडून वारंवार पाठपुरावा करूनही कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप करत पठारवाडी येथील सौ. स्वाती शशिकांत बोंगाणे यांनी 20 जुलै 2026 पासून कुटुंबासह उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. याबाबत त्यांनी निवेदन सादर केले आहे.निवेदनात म्हटले आहे की, कर्जत शहरातून जाणारा हा प्रमुख राज्यमार्ग विविध तालुके, जिल्हे आणि राष्ट्रीय महामार्गांना जोडणारा महत्त्वाचा मार्ग आहे. मात्र रस्त्यालगत झालेल्या अनधिकृत अतिक्रमणांमुळे रस्ता अरुंद झाला असून दिवसभर वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. त्यामुळे वाहनचालकांसह पादचारी आणि नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.शाळा आणि महाविद्यालये सुरू व सुटल्यानंतर विद्यार्थ्यांना जीव धोक्यात घालून रस्ता ओलांडावा लागतो. पावसाळ्यात रस्त्यावर साचणारे पाणी आणि वाहतूक कोंडीमुळे अपघातांचा धोका वाढत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. रुग्णवाहिका व अग्निशमन दलाच्या वाहनांनाही वेळेत मार्ग मिळत नसल्याने आपत्कालीन सेवांवर परिणाम होत असल्याची गंभीर बाब त्यांनी निदर्शनास आणली आहे.बेताल पार्किंग, अतिक्रमणे आणि अंतर्गत रस्त्यांवरील अडथळे यामुळे शहरातील वाहतूक व्यवस्था पूर्णपणे कोलमडली असल्याचा आरोप करत सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्यांची नियंत्रण रेषा लक्षात घेऊन तातडीने अतिक्रमणे हटवावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. वारंवार निवेदने देऊनही प्रशासनाने कारवाई केली नसल्यामुळे अखेर 20 जुलै 2026 रोजी कुटुंबासह आमरण उपोषण करण्याचा निर्णय घेतल्याचे स्वाती बोंगाणे यांनी स्पष्ट केले आहे.

कर्जत येथे वायरच्या बहाण्याने व्यापाऱ्याला पाऊण लाखाचा गंडा;

बोगस चेक देऊन फसवणूक, पोलीस ठाण्यात तक्रार दाखल

कर्जत:स्वतःला कॉन्ट्रॅक्टर सांगत एका भामट्याने कर्जत येथील 'दिशा इलेक्ट्रिकल्स' या दुकानातून सुमारे पाऊण लाख रुपयांचे कॉपर वायरचे बंडल घेऊन बँक खात्यात पैसे नसलेला बोगस चेक देऊन फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी दिशा इलेक्ट्रिकल्सचे संचालक भाऊसाहेब रानमाळ मेजर यांनी कर्जत पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली आहे. याबाबत मिळालेली सविस्तर माहिती अशी की, रविवार, ५ जुलै रोजी एका अज्ञात भामट्याने ९५७९६३९२०९ या मोबाईल क्रमांकावरून भाऊसाहेब रानमाळ मेजर यांच्याशी संपर्क साधला. त्याने आपले नाव 'श्री. शिंदे कॉन्ट्रॅक्टर' असे सांगून, कर्जत येथील एका साईटवर कामासाठी कॉपर वायर हवी असल्याचे सांगितले. वायरच्या दराबाबत चौकशी केल्यानंतर त्याने मोठ्या प्रमाणावर वायर बंडलची ऑर्डर दिली आणि याचे पेमेंट चेकद्वारे देण्याचे ठरवले. व्यापाऱ्याचा विश्वास संपादन करून या भामट्याने स्वतः प्रत्यक्ष समोर न येता, कर्जत मधील एका स्थानिक रिक्षा आणि चालकाकडे ६६ हजार रुपयांचा चेक सुपूर्द केला. तो चेक दुकानात पाठवून रिक्षाचालकामार्फत ६६ हजार रुपये किमतीचे कॉपर वायरचे बंडल मागवून घेतले व तेथून पळ काढला.दोन दिवसांनंतर जेव्हा संचालक भाऊसाहेब रानमाळ मेजर यांनी, मूळ व्यापाऱ्यामार्फत तो ६६ हजार रुपयांचा चेक बँकेत जमा केला, तेव्हा त्या भामट्याच्या खात्यात पुरेशी रक्कम नव्हती. अधिक चौकशी केली असता ते बँक खातेच बोगस असल्याचे निष्पन्न झाले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच रानमाळ यांनी भामट्याच्या मोबाईल नंबरवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र तेव्हापासून तो फोन बंद येत आहे. आपली फसवणूक झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर दिशा इलेक्ट्रिकल्सचे संचालक भाऊसाहेब रानमाळ मेजर यांनी कर्जत पोलीस ठाण्यात धाव घेत संबंधित भामट्याविरुद्ध लेखी तक्रार नोंदवली आहे. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत असून, मोबाईल क्रमांक आणि रिक्षाचालकाकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे भामट्याचा शोध सुरू आहे. या घटनेमुळे कर्जत येथील व्यापारी वर्गात चिंतेचे वातावरण पसरले असून, अनोळखी व्यक्तींशी चेकद्वारे व्यवहार करताना काळजी घेण्याचे आवाहन केले जात आहे.



RNI No.. MAHMAR/2015/65594 Post Regd No.: ANR/080/2018-2020 संपादक भाऊसाहेब तोरडमल



पान २ वरुण - **'सर्व सामाजिक संघटना' संस्थेला राज्यस्तरीय प्रथम क्रमांक**

सलग २१०० दिवसांचे श्रमदान आणि हरित कर्जत घडविण्याचा संकल्प आज राज्यस्तरावर गौरवला गेल्याने कामाची ऊर्जा अधिक वाढली आहे." या अभूतपूर्व यशाबद्दल संघटनेच्या वतीने सर्व शिलेदार, सहकारी, हितचिंतक, दाते, नागरिक आणि प्रशासनाचे मन:पूर्वक अभिनंदन करून आभार मानण्यात आले आहेत. या ऐतिहासिक यशाबद्दल सध्या संपूर्ण कर्जत तालुक्यातून आणि सामाजिक स्तरातून 'सर्व सामाजिक संघटना' वर कौतुकाचा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

ADCC बँक निवडणुकीसाठी विश्वनाथ जाधव बिनविरोध; सहकारातील नवे सत्ता समीकरण चर्चेत

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या (ADCC) आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कर्जत तालुक्यातील कापरेवाडी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीमध्ये महत्त्वपूर्ण राजकीय आणि सहकार क्षेत्रातील घडामोड घडली आहे. सोसायटीच्या विशेष सभेत ज्येष्ठ सहकार नेते, यशस्वी उद्योजक तसेच पुणे पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक विश्वनाथ गणपत जाधव यांची मतदार ठराव प्रतिनिधी म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली.ही निवड लोकनियुक्त सरपंच तथा उद्योजक अनिल खराडे यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. विशेष म्हणजे कापरेवाडी व शिंदेवाडी येथील ग्रामस्थ, सोसायटीचे संचालक मंडळ आणि पदाधिकाऱ्यांनी एकमताने विश्वनाथ जाधव यांच्या नावाला पाठिंबा देत ठराव मंजूर केला. त्यामुळे गावातील एकजूट पुन्हा एकदा अधोरेखित झाली असून सहकार क्षेत्रात कापरेवाडीचे राजकीय वजन वाढल्याची चर्चा सुरू झाली आहे.निवडीनंतर कापरेवाडी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी, ग्रामपंचायत आणि ग्रामस्थांच्या वतीने विश्वनाथ जाधव यांचा पुष्पगुच्छ देऊन भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी ही निवड गावाच्या विकासासाठी आणि सहकार क्षेत्रातील सक्षम नेतृत्वासाठी महत्त्वपूर्ण असल्याचे मत व्यक्त केले.सत्काराला उत्तर देताना विश्वनाथ जाधव म्हणाले, "सरपंच अनिल खराडे, संचालक मंडळ आणि ग्रामस्थांनी माझ्यावर दाखविलेल्या विश्वासामुळे ही बिनविरोध निवड शक्य झाली. या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही आणि सहकार क्षेत्रात गावाचे नाव उंचावण्यासाठी प्रयत्नशील राहीन."गावाच्या एकोप्याचे दर्शन घडविणाऱ्या या निर्णयामुळे आगामी जिल्हा बँक निवडणुकीत कापरेवाडीची भूमिका महत्त्वाची ठरणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.या कार्यक्रमाला सरपंच अनिल खराडे, गणपत जाधव, नवनाथ मोडके विठ्ठल खराडे, दादा कदम, मिना रोकडे, स्वप्नील मुलिक, तात्या सस्ते,नागनाथ रेडेकर, जगन्नाथ रेडेकर, शिवाजी शिंदे, छबा कदम, मधुकर कुपरे, बडाबाई कदम, भिवा शेळके, शलबाई धनवटे, विठ्ठल चव्हाण सागर ढेरे, विशाल दिवटे ,यांच्यासह सोसायटीचे संचालक, कार्यकर्ते, मित्रपरिवार तसेच कापरेवाडी व शिंदेवाडी येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते...

कर्जतच्या राजकारणात बदलाचे वारे; आता विकासाचीच परीक्षा!

कर्जतच्या राजकारणात बदलाचे वारे; आता विकासाचीच परीक्षा!– भाऊसाहेब तोरडमल, संपादक



गेल्या काही दिवसांपासून कर्जत तालुक्याच्या राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय क्षेत्रात घडलेल्या वेगवान घडामोडींनी संपूर्ण तालुक्याचे लक्ष वेधून घेतले आहे. नगरपंचायतीतील अनपेक्षित राजकीय समीकरणे, नव्या नगराध्यक्षांची बिनविरोध निवड, संत गोदड महाराज रथोत्सवावरून निर्माण झालेला अंतर्गत वाद, शिक्षण क्षेत्रातील गुणवंतांचा गौरव, तसेच अतिक्रमणासारख्या जनहिताच्या प्रश्नांवर सुरू झालेली आंदोलने... या सर्व घडामोडींवर नजर टाकल्यास कर्जत सध्या एका नव्या वळणावर उभा असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.राजकीय 'तडजोड' की विकासाची 'नवे पहाट' ? नगरपंचायतीतील सत्तांतर ही केवळ एक राजकीय घटना नाही, तर ती स्थानिक जनतेच्या अपेक्षांची एक नवी सुरुवात आहे. कालपर्यंतचे कट्टर विरोधक सत्ता मिळवण्यासाठी एकत्र आले, नवी समीकरणे आकाराला आली आणि नगराध्यक्षपदी नवीन नेतृत्वाची बिनविरोध निवड झाली. या घडामोडींमुळे राजकारणात कोण जिंकले आणि कोण हरले, यापेक्षा आता कर्जत शहरासह तालुक्याच्या विकासासाठी ही मंडळी किती वेगाने पावले टाकणार, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. राजकीय आघाड्या आणि युत्या भविष्यात टिकतील की नाही, हा नंतरचा भाग; पण नागरिकांना स्वच्छ रस्ते, मुबलक पाणी, स्वच्छता, रोजगार आणि मूलभूत सुविधा कधी मिळणार? सत्तेसाठी जर दोन्ही आमदारांचे गट एकत्र येऊ शकतात, तर मग कर्जतच्या 'एमआयडीसी' (MIDC) चा प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी हे दोन्ही नेते एकत्र का येऊ शकत नाहीत? असा संतप्त सवाल आज तालुक्यातील बेरोजगार तरुण विचारत आहेत.प्रशासन आणि आंदोलनाची वेळदुसरीकडे, शहरातील अतिक्रमणाच्या गंभीर प्रश्नावर नागरिकांना थेट आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागला. ही बाब स्थानिक प्रशासन आणि लोकप्रतिनिधींसाठी निश्चितच आत्मपरीक्षण करायला लावणारी आहे. सर्वसामान्य नागरिकांवर उपोषण करण्याची वेळ येऊ नये, ही खरी लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाची जबाबदारी असते. जर वेळेत संवादातून प्रश्न सुटले, तर रस्त्यावर उतरून संघर्ष करण्याची वेळ येत नाही, याचे भान यंत्रणेने ठेवणे गरजेचे आहे. शिक्षणातील सकारात्मकताराजकारणाच्या या गदारोळात काही आश्वासक चित्रही पाहायला मिळाले. विविध शैक्षणिक संस्थांनी गुणवंत विद्यार्थ्यांचा आणि शिक्षकांचा सन्मान करून समाजात एक सकारात्मक संदेश दिला आहे. शिक्षण हीच खरी प्रगतीची गुरुकिल्ली आहे, याची जाणीव या निमित्ताने पुन्हा झाली. राजकीय वादांच्या पलीकडे जाऊन अशा चांगल्या गोष्टींची नोंद घेणे हे समाजाच्या प्रगतीसाठी आवश्यक आहे.

श्री संत सद्गुरू गोदड महाराजांचा उत्सव आणि वादाची सावट

सध्या कर्जतचे ग्रामदैवत श्री संत सद्गुरु गोदड महाराज रथोत्सवाचे वेध सर्वांना लागले आहेत. मात्र, यंदा या उत्सवाच्या तयारीला वादाची किनार लागली आहे. नव्याने स्थापन झालेले ट्रस्ट विरुद्ध ट्रस्ट मान्य नसलेले मानकरी, अशा दोन्ही गटांकडून समांतर पातळीवर रथोत्सवाची तयारी सुरू आहे. हा रथोत्सव म्हणजे केवळ एक धार्मिक विधी नाही; तर तालुका, जिल्हा आणि राज्याच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या सर्वधर्मीय भाविकांच्या एकोप्याचे, परंपरेचे आणि श्रद्धेचे प्रतीक आहे. परंतु, सद्यस्थिती पाहता हा पवित्र उत्सव पावती पुस्तके, हिशोब, ट्रस्ट, मानकरी, पुजारी आणि शहरातील प्रमुख राजकारणी यांच्या अंतर्गत वादात गुंतलेला दिसत आहे. देणगी स्वरूपातील पैसा तर सामान्य गावकऱ्यांचा आणि भाविकांचा आहे; मग हा वाद कशासाठी? यामध्ये दोष कुणाचा? श्री संत सद्गुरु गोदड महाराजांच्या विचारांचा विसर पडलेल्यांचा, की मूक गिळणार्या गावकऱ्यांचा? या वादातून अखेर रथोत्सवाचे काय होणार? याकडेच आता संपूर्ण कर्जत शहरासह तालुक्याचे लक्ष लागले आहे. 'समृद्ध कर्जत' ची भूमिकाआज कर्जतसमोर विकासाच्या अनेक संधी आहेत. परंतु, या संधींचे सोने करण्यासाठी प्रबळ राजकीय इच्छाशक्ती, पारदर्शक प्रशासन आणि जनतेचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे. निवडणुका, पदे आणि सत्ता ही तात्पुरती माध्यमं आहेत; जनता जनार्दनाचा विश्वास कायम ठेवायचा असेल तर 'कामच बोलले पाहिजे'.'साप्ताहिक समृद्ध कर्जत' ची भूमिका पहिल्यापासून अत्यंत स्पष्ट आणि पारदर्शक राहिली आहे. चांगल्या कामाचे कौतुक करणे आणि जनहिताच्या, अन्यायाच्या प्रश्नांवर ठामपणे आवाज उठवणे हेच आमचे कर्तव्य आहे. कोणत्याही राजकीय पक्षाची किंवा गटाची तळी न उचलता, नेहमी जनतेच्या बाजूने उभे राहणे हीच आमची पत्रकारिता आहे. कर्जतचा सर्वांगीण विकास, सामाजिक सलोखा आणि पारदर्शक प्रशासन हीच आजची खरी गरज आहे. बदलाची सुरुवात तर झाली आहे; आता या बदलाला योग्य आणि शाश्वत विकासाची दिशा देण्याची जबाबदारी सर्वपक्षीय नेते आणि प्रशासनाची आहे!..

श्री सद्गुरू कृपा

उज्वल यशाची परंपरा...

पाटील सायन्स अॅकॅडमी, कर्जत

Best Academy for

JEE / NEET / MHT - CET / BOARD / NDA

in Maharashtra

2026-27 ADMISSION OPEN

जिथे विद्यार्थ्यांची स्वप्ने साकार होतात
शिक्षणाबरोबर संस्कार देणारी व विज्ञानाबरोबर
अध्यात्मक उज्वल भविष्य देणारी एकमेव अॅकॅडमी



ADMISSION OPEN

NEET


शिंदे अमर
601
(MBBS)

* गुणवंत विद्यार्थी *


अनारसे दिपक
PCB, 97.78 %


हजारे स्वप्निल
PCM,99.27 %

NEET


मंडलिक करण
435

ADMISSION OPEN


मंडलिक करण
PCB, 99.67 %


कदम अनिकेत
PCM, 98.50 %


शिंदे अमर
PCB, 98.27 %


शेंडकर संध्या
PCB, 96.45 %


देशमुख गायत्री
PCM, 96.05 %


वारे आरती
PCM, 95.59 %


पवार स्मितल
PCM, 95.54 %


गरड दादा
PCB, 94.44 %


हडनळे सुरज
PCM, 94.31 %


गदादे ओंकार
PCB, 92.36 %


तापकिर ओंकार
PCB, 92.31 %


पायल जाधव
PCB, 91.95 %
Nursing, 91.23 %


जाधव सारंग
PCB, 91.51%


मुरकुटे विराज
PCM, 90.89 %


मोदळे स्वप्निल
PCB, 90.54 %


कोकणे सारंग
PCM, 90.53 %


धांडे मिनिनाथ
PCB, 89.85 %
PCM, 86.34%


यश टकले
PCM, 88.55 %


भांडवलकर समर्थ
PCB, 88.13 %
PCM, 84.30 %


सुरज जाधव
PCM, 87.59 %


गोडसे तेजश्री
PCM, 87.44 %


टेकाळे लक्ष्मण
PCM, 86.37 %


वेद्रे मंगेश
PCM, 87.37 %


सायकर कृष्णा
PCM, 86.26 %




फाळके हरिओम
PCB, 85.13 %
Nursing 86.80%


जय नाळे
PCM, 84.87 %


तोरडमल शुभम
PCM, 83.74 %


नाळे ओंकार
PCM, 79.65 %


सुपेकर अजिंक्य
PCM, 79.65 %



* वैशिष्ट्ये -

* तज्ञ व अनुभवी शिक्षकवृंद
* मर्यादित विद्यार्थी संख्या
* मुला, मुलींसाठी स्वतंत्र अभ्यासिका
* प्रत्येक बॅचमध्ये मुला, मुलींसाठी स्वतंत्र होस्टेल, मेस सुविधा उपलब्ध
* अत्याधुनिक आणि वातानुकुलित क्लासरूम
* रोज DPP / Doubt Session / Group Discussion.
* Chapterwise Weakly Test / Mock Test.
* NEET / JEE / MHT-CET / STATE BOARD साठी उच्च दर्जाचे चांगले संशोधित आणि सर्वसमावेशक स्टडी मटेरियल.

11th ब्रीज कोर्स (10th students) Start - 20th April

12th NEET / JEE / MHT-CET / STATE BOARD
1st Batch Start - 1st May | 2nd Batch Start - 1st June

* 8th, 9th, 10th च्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी NEET / JEE / MHT-CET परिक्षेवर आधारित Foundation Course ची स्वतंत्र बॅच
* प्रत्येक विद्यार्थ्याची Biometric हजेरी SMS द्वारे पालकांच्या मोबाईलवर

कोटा, लातुर, पुणे, बारामती जाण्याची गरज नाही.. आता कर्जतमध्ये सर्वकाही..
कॉलेज / कोचिंग / निवास / भोजन / अभ्यासिका सर्व सुविधा एकाच छताखाली

तोरडमल सर	कुलकर्णी सर	घालमे सर	शेळके सर	विवेक सर
7040394100	8888779998	9561956562	7083949499	8894442674

सर्वाधिक निवड गुणोत्तर : पाटील सायन्स अॅकॅडमीचे निकाल आमच्या विद्यार्थ्यांची आवड, कठोर परिश्रम आणि प्रयत्नांचे प्रतिबिंब आहेत. आतापर्यंत आम्ही स्पर्धात्मक परीक्षांमध्ये उल्लेखनीय निवड गुणोत्तर (90% पेक्षा जास्त) प्राप्त केले आहे.

पत्ता : गुरूमाऊली बिल्डींग, हॉटेल मधुबन शेजारी, कर्जत - मिरजगांव रोड, कर्जत, जि. अहिल्यानगर

सुवर्णसंधी सुवर्णसंधी सुवर्णसंधी

Work From HOME Earn Extra INCOME

स्वत:चा व्यवसाय करा, व अतिरिक्त भरघोस उत्पन्न मिळवा.

कुटुंबाला आर्थिक हातभार लावा, स्वत:ची वेगळी ओळख निर्माण करा सर्व क्षेत्रातील व्यक्तीसाठी सुवर्णसंधी आपले आयुष्य बदलण्यास आम्ही मदत करू शकतो

९ ते ५ जॉब, प्रवास, ताण यामुळे कंटाळलात ? सुरु करा स्वत:च व्यवसाय पार्ट / फुल टाईम घरुन व्यवसाय करण्याची सुवर्णसंधी

- स्वत:च स्वत:चे बॉस बना.
- शून्य गुंतवणूक.
- अमर्यादित उत्पन्न.
- आपल्या वेळेनुसार काम करा.
- आपणास हवे तेथून काम करा.



ट्रेनिंग व मार्गदर्शन दिले जाईल.

टिप : गुहिणी, डॉक्टर्स, बिझनेसमन, रिटायर्ड, टॅक्स कन्सलटंट आणि लाईफ-जनरल-हेल्थ-म्युच्युअल फंड एजंट या सर्वासाठी संधी. योग्य वेळी घेतलेल्या निर्णयतुमचे तुमचे आयुष्य बदलू शकते.



Bagal Servicess

बागल सर्व्हिसेस

गाळा क्र- 26, मेट्रो कॉम्प्लेक्स,
कुळेधरण रोड, कर्जत, जि.अ.नगर

श्री. महेंद्र बागल
9011 40 0903
8421 47 0903